**पुणे महानगरपालिका**

**महिला व बाल कल्याण समिती**

**कार्यपत्रिका क्र. १२**

महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा शुक्रवार,दिनांक २४/८/२०१८ रोजी दुपारी ३=३०(साडे तीन ) वाजता महात्मा ज्योतिबा फुले सभागृह (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**विषय क्र. ६१**

**मा.सौ.श्वेता चव्हाण व मा.अविनाश साळवे यांचे दि.६.८.२०१८ चे पत्र .**

पुणे महानगरपालिकेच्या स्व.भा.राजीव गांधी रुग्णालय येरवडा येथे सुमारे अंदाजे १,२०,००० स्क्वे.फुट जागेमध्ये बाह्यरुग्ण विभाग,प्रसुतिगृह ,नवजात अर्भक अतिदक्षता विभाग इ. सुविधा पुरविण्यात येतात. सदर इमारतीचे क्षेत्रफळ विचारात घेता सदरील जागेपैकी मोठ्या प्रमाणावर जागा विनावापर पडून आहे. येरवडा परिसरातील सर्व सामान्य नागरिकांना सर्व साधारण उपचार व विविध शस्त्रक्रियाकरिता खाजगी रुग्णालयांवर अवलंबून रहावे लागते व तेथील दर सर्व सामान्य रुग्णांना परवडणारे नसतात.सदरची इमारती मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल आऊटसोर्सिंग पध्दतीने पुणे मनपा व खाजगी वैद्यकीय संस्था / चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने चालविणेकरिता दिल्यास सदर इमारतीमध्ये असणारे १,२०,००० स्क्वे.फुट क्षेत्रफळ पुर्णत: उपयोगात आणता येईल व शासकीय दरामध्ये मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलची सुविधा सर्वसामान्य व गरीब रुग्णांना मिळू शकेल.

तरी पुणे महानगरपालिकेचे स्व.भा.राजीव गांधी रुग्णालय येथे आऊटसोर्सिंग पध्दतीने मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलची करीता पुण मनपा व खाजगी वैद्यकीय संस्था / चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने चालविणेस देण्यात यावे.

**विषय क्र. ६२**

**मा.ॲड. भैय्यासाहेब जाधव यांचे दि.८.८.२०१८ चे पत्र**

पुणे महानगरपालिके मध्ये बालवाडी शिक्षिका व सेविका ( मराठी,उर्दू ,कन्नड , इंग्रजी ) या मानधन तत्वावर आहेत. महाराष्ट्रातील नवी मुंबई , ठाणे, पिंपरी चिंचवड अशा महानगरपालिकांमध्ये बालवाडी शिक्षिका व सेविका यांना र.रु.१५,०००/- पर्यंत मानधन असून आपल्या पुणे महानगरपालिकेचे मानधन हे अत्यंत कमी असून त्यामध्ये वाढ होणे अत्यावश्यक आहे. या मानधनामध्ये वार्षिक १० टक्के वाढ व महागाई भत्ता देण्यात यावा.

तसेच सदर बालवाडी शिक्षिका व सेविका या पूर्णत: याच कामावर अवलंबून असल्याने त्यांत पुणे महानगरपालिकेची वैद्यकीय सहाय योजना चालू करावी. सदर बालवाडी शिक्षिका व सेविका यांना आजारपणाची रजा नसून त्यांना वैद्यकीय रजा देण्यात याव्यात .

**विषय क्र. ६३**

**मा.सौ.वासंती जाधव व मा.सौ.हर्षाली माथवड यांचे दि.८.८.२०१८ चे पत्र**

प्रभाग क्र.१२ ( मयुर कॉलनी - डहाणुकर कॉलनी ) येथील स.नं.५०/१ श्रीकष्ण कॉलनी ,डी.पी.रोड, कोथरुड येथे असणारे जुने सार्वजनिक शौचालय हे वापरविना पडून आहे. तरी सदर शौचालय पाडण्यात यावे.

**विषय क्र. ६४**

**मा.सौ.हर्षाली माथवड व मा.सौ.वासंती जाधव यांचे दि.८.८.२०१८ चे पत्र**

प्रभाग क्र.१२ ( मयुर कॉलनी – डहाणुकर कॉलनी ) भेलकेनगर शांतीधाम सोसायटी लगत जुने सार्वजनिक शौचालय हे वापरविना पडून आहे. तरी सदर शौचालय पाडण्यात यावे.

**विषय क्र. ६५**

**मा.सौ.वासंती जाधव व मा.सौ.हर्षाली माथवड यांचे दि.८.८.२०१८ चे पत्र**

प्रभाग क्र.१२ ( मयुर कॉलनी – डहाणुकर कॉलनी ) येथील नानी नानी पार्क शेजारील शास्त्रीनगर येथे असणारे जुने सार्वजनिक शौचालय हे वापरविना पडून आहे. तरी सदर शौचालय पाडण्यात यावे.

**विषय क्र. ६६**

**मा.सौ.राजश्री नवले ,अध्यक्षा महिला व बाल कल्याण समिती व मा.सौ.वृषाली चौधरी यांचे दि. १६.८.२०१८ चे पत्र .**

महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना आरोग्य सुविधा मिळाव्यात म्हणून मनपातर्फे विविध भागात हॉस्पिटल/रुग्णालये बांधण्यात आलेली आहेत. याठिकाणी आरोग्य उपचारांबरोबरच प्रसुती गृहांची देखील सुविधा उपलब्ध आहेत . या ठिकाणी प्रसुतीसाठी येणाऱ्या गरीब महिलांची संख्या जास्त आहे. अनेक वेळेस प्रसुतीसाठी येणाऱ्या महिलांना अचानक त्रास होऊ लागल्यास तातडीने हॉस्पिटल / रुग्णालयात जाण्यास उशीर झाल्यास अशा महिलांची प्रसुती रस्त्यामध्येच झाल्याच्या किंवा वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे बाळ /बाळंतीण मृत्यू पावल्याच्या अनेक घटना यापूर्वी झाल्या आहेत. त्यामुळे वेळेअभावी हॉस्पिटल / रुग्णालयांमध्ये प्रसुतीसाठी वेळेवर पोहचण्याची शक्यता असल्याचा फोन किंवा निरोप आल्यास अशा ठिकाणी जावून अडचणीतील बाळंतीन महिलेस त्वरीत उपचार मिळावेत म्हणून महानगरपालिके तर्फे किमान दोन फिरते सुसज्य प्रसुतीगृह व्हॅन( रुग्ण वाहिका) मध्यवर्ती अशा कमला नेहरु रुग्णालय / स्व. राजीव गांधी रुग्णालय / कोथरुड दवाखाना इ. ठिक़ाणी ठेवण्यात याव्यात .

सन २०१८–१९ च्या शिलकी अंदाजपत्रकामधून तातडीने दोन फिरते सुसज्य प्रसुतीगृह व्हॅन ( रुग्ण वाहिका ) खरेदी कराव्यात तसेच यापुढील काळात फिरते प्रसुतीगृह व्हॅन खरेदी करणे, दुरुस्ती यासाठी मा.महापालिका आयुक्त यांच्यातर्फे दरवर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये पुरेशी तरतूद करण्यात यावी .

**विषय क्र. ६७**

नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेतंर्गत सन २०१८–१९ या आर्थिक वर्षाकरिता लोकप्रतिनिधी मार्फत प्रस्तावित करणेत आलेल्या कामांस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ /समाज कल्याण/ ३९०, दिनांक १३/८/२०१८ चे पत्र.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका